Impact Factor 4.574

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Journal

VOL-V ISSUE-V May 2018

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# संत नामदेव

संदिप चपटे

तेराव्या शतकाच्या अखेरीस संत ज्ञानेश्वर आणि नामदेव ह्यांनी महाराष्ट्रात भक्तिमार्गातून सांस्कृतिक चळवळीस प्रारंभ केला. त्यातील ज्ञानाचा देव- ज्ञानदेव, तर दुसरा नामाचा देव - नामदेव होता. दोघांनीही महाराष्ट्रातील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठीच तीर्थयात्रा केली होती. एवढेच नाही, तर प्रत्येक व्यक्तीस भक्तीत व अध्यात्माच्या क्षेत्रात मुक्तपणे विकास करता यावा म्हणून दोघांनीही भक्तिमार्गाची सोय करून दिल्यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात नव्या आध्यात्मिक व धार्मिक लोकशाहीचा जन्म झाला होता. ह्या आध्यात्मिक लोकशाहीला नामदेवांच्या काळात संतमेळा हे गोंडस नाव मिळाले होते. हा संतमेळा चंद्रभागेच्या तीरी हरिनामाच्या गजरात स्वत:ला विसरू लागला होता कारण चांगले आचार आणि विचार. ह्या संतमंडळी आचार्य, अध्यक्ष व गुरू ज्ञानेश्वरच असले, तरी नामदेव हे ह्या मंडळाचे आद्यप्रचारक होते.[१]

नामदेवांच्या जन्म इ.स. १२७० साली झाला. दामाशेटी शिंप्याचे हे चिरंजीव पोरवयापासून पंढरीच्या विठ्ठलाचे एकांतिक भक्त होते. ज्ञानदेवांच्या सान्निध्यात आल्यावर मूळच्या भावभक्तीला तत्त्वजिज्ञासेची जोड लाभून आत्मोद्धाराची तळमळ त्यांच्या ठिकाणी निर्माण झाली. दूध व पाणी जर एका भांड्यात ठेवले तर लगेच मिसळून जातात तसे नामदेवांचे झाले. नामदेवांच्या भक्तीला प्रथम अद्वैतबोधाचे अधिष्ठान नव्हते. विसोबा खेचराकडून गुरुपदेश मिळाल्यावर त्यांच्या सगुणोपासनेला अद्वैताचा डोळसपणा आला, त्यांच्या जीवननिष्ठेला चिद्विलासवादाच्या भूमिकेने खरे स्थैर्य प्राप्त झाले. ज्ञानेश्वरांसमवेत केलेल्या तीर्थयात्रेची हकिगत स्वत: नामदेवांनीच तीर्थावळी प्रकरणात लिहून ठेवली आहे. त्यावरून ह्या काळातच नामदेवांना आपल्या जीवितकार्याची ओळख झाली. नामदेवांचा वैष्णववीर आपल्या अद्वैतनिष्ठ भक्तिमार्गाचा प्रभावी प्रचारक होईल, अशी खात्री ज्ञानेश्वरांना पटली. म्हणूनच जणू काही वारकरी पंथाच्या प्रसाराचे आपले कार्य नामदेवांवर सोपवून ज्ञानेश्वर समाधिस्थ झाले. ज्ञानेश्वरांनंतर वारकरी पंथाची धुरा नामदेवांनी ५४ वर्षे सांभाळली. ज्ञानेश्वरांनी फक्त भक्तीच्या मर्यादित क्षेत्रात जातीचा विचार अप्रमाण ठरविला. पण एकंदर समाजशासन यंत्रणेत वर्णभेदाला, जातिभेदाला सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने उचलून धरले.

संतसंग हा धर्म साधनेचा एक प्रमुख भाग आहे हे दाखवून दिले. तर नामदेवांनी त्यांच्याही पुढचा टप्पा गाठला. त्यांनी भागवतधर्मातून वर्णधर्माचे, जातिप्रथेचे समूळ उच्चाटन तर केलेच, परंतु सामाजिक शासनातूनही वर्णविचारांचे वतन पूर्णपणे रद्द व्हावे, असे सूचित केले आहे. म्हणूनच नामदेवांच्या कारकिर्दीत सावतामाळी, नरहरी सोनार, जोगा परमानंद, भक्त नागा, सेना न्हावी,

चोखामेळा, गोरा कुंभारासारखे विविध जाती-धर्माचे संत गोळा झाले. त्यांनी आपापल्या व्यवसायातील शब्दसंपत्तीने भक्तिमार्गाची वाट प्रफुल्लित केली.[२]

जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था, वर्गव्यवस्था मोडण्याचे प्रभावी काम नामदेवांनी केले. परंतु हेच कार्य भगवान गौतम बुद्धांनी २५०० वर्षांपूर्वी आरंभिले होते. म्हणून प्रकर्षाने असे निदर्शनास येते की, संत नामदेवांच्या अभंगवाणीवर विचार-आचारांवर भगवान बुद्धांचे संस्कार होते.

नामदेवांनी आपल्या अभंगात एकूण ४९१ अभंग आत्मचरित्रपर लिहिले आहेत. म्हणूनच संत नामदेव हे मराठी साहित्यातील पहिले आत्मचरित्रकार ठरतात. नामदेवांनी लिहिलेल्या आत्मपर अभंगातून त्यांच्या लौकिक जीवनाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते.

संत ज्ञानेश्वरांचे चरित्र देखील संत नामदेवांनी लिहिले आहे. आदी, समाधी, तीर्थावळी अशा तीन प्रकरणांतून त्यांनी ज्ञानेश्वरांचे चरित्र लिहिले असून त्यांची अभंगसंख्या सुमारे साडेतीनशे आहे. ज्ञानेश्वरांच्या चरित्राबरोबरच इतर संतांची चरित्रे देखील लिहिली आहेत. त्यात गोरा कुंभार, जनाबाई, चोखामेळा ह्यांची चरित्रे सुंदरपणे रेखाटली आहेत. देवासकट सर्वकाही प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य प्रयत्नात आहे ह्यावरून कळते. त्याचबरोबर नामदेवांनी बाळक्रीडेचे अभंग देखील लिहिले आहेत. श्रीकृष्णाच्या बालपणापासून ते यौवन अवस्थेपर्यंत कृष्ण जीवनावरील विविध प्रसंग नामदेवांनी ह्या अभंगातून टिपले आहेत. बालक्रीडेच्या अभंगांतून नामदेवांचे निष्पाप बालरूप व्यक्तिमत्त्व तर दिसून येतेच, पण ह्या अभंगातून रसाळ आणि मनोज्ञ अशा शैलीचे दर्शनही घडते. आत्मचरित्रकार, चरित्रकार, अभंग, रूपके, आरत्या, भूपाळ्या आणि आद्य कीर्तनकार म्हणून संपूर्ण महाराष्ट्राला नामदेव सुपरिचित आहेत. शंकराने जसे विष पचवले म्हणून त्याला महादेव म्हणतात, तसे नामदेवाला आत्मचरित्रकार म्हणायला काय हरकत?

नामदेवांनी जी काही रूपकात्मक अभंगरचना केली त्यात शेत, धेनू, घोंगडे, पांगुळ जाते, अशी रूपके प्रामुख्याने आहेत. रूपकांच्या माध्यमातून भक्तीची वाट सामान्यजनांना खुली करून ठेवली. अभंगाशिवाय आरत्या व भूपाळ्या अशीही नामदेवांची रचना आहे. एकूण नामदेवांचे चरित्र तपासले असता, त्यांचे लेखन तपासले असता त्यांच्यावर भगवान गौतमबुद्धांच्या विचारांचा प्रभाव आहे हे अभ्यासांती सहज लक्षात येते.

भगवान बुद्धांनी भक्ती, कर्म, वंदना, आत्मोद्धाराला विशेष महत्त्व दिले आहे. नामदेवांनी देखील सामान्यजनांना उपदेश करताना भक्तिमार्गाचे महत्त्व सांगितले आहे. स्वत: नामदेव भक्तिमार्गात बुडून गेले आहेत. ते साक्षात विठ्ठलालाच म्हणतात,

माझिया चित्तासी फार झाले क्लेश ।
व्यथा म्यां आयुष्य गमाविले ।।
शतकोटी तुझे करीन अभंग ।
सिद्धीस ही न्यावा पण माझा।।[३]

उपरोक्त विवेचनावरून नामदेवांच्या भक्तियोगाचा परिचय घडतो. नामदेवांच्या भगवान गौतम बुद्धांच्या शून्यतत्त्वाचा मराठी संत परंपरेवर मोठा पगडा दिसून येतो. त्यातून संत नामदेव देखील सुटले नाहीत. संत नामदेव म्हणतात,

निरशून्य शून्याचा उपरम साधून ह्रदयात वैकुंठ निर्माण केले।
निरशून्य साधूनी उपरम वैकुंठीचे धाम ह्रदय केले ।।

जावे शीवे शेजे पंक्तीस बैसली । पंचतत्त्वाशी बोली नाही तेथे।[४]

संत नामदेव शून्याला ब्रह्म, गगनाकार, निरंजनरूप मानतात.

योगियाचे ब्रह्म शून्य व्योमाकार[५]

उपरोक्त विवेचनावरून असे प्रकर्षाने जाणवते की, शून्य तत्त्वविचाराचा प्रचंड पगडा संतसाहित्यावर दिसून येतो. भगवान गौतम बुद्धांनी सांगितलेल्या पुण्यानुमोदनाचा मराठी संतावर प्रभाव दिसून येतो.

नामदेव महाराज पुण्यानुमोदनाच्या भाषेत म्हणतात, तू अनाथाचा कैवारी आहेस, असे तुझे ब्रीद आहे. तू आमचा देखील कैवारी होऊन हाती सुदर्शन घेऊन वेगाने ये. कारण तू द्रौपदीला मदत करायला धावलास, गजेंद्राला वाचविलेस, कळवळ्याने सुदाम ब्राह्मण, भक्त प्रल्हाद, दूर्वास, विदूर, अर्जुन इत्यादींसाठी धावलास. तू माझे गुणदोष पाहू नकोस कारण माझ्यापेक्षाही वाईट लोकांना तू तारलेस.

आडलिया कोणता अनाथ कैवारी । ब्रीद चराचरी वर्णितातीं।।
येई गा श्रीहरी तू आमचा कैवारी । सुदर्शन करी वेगी घेई ।।
द्रौपदीच्या आकांती पावला तो लौकरी । तैसा झडकरी शीघ्र येई ।।
राजेंद्राकारणा कळवळा अगाध । जगा तुझे ब्रीद तैसा येई ।।
सुदामा ब्राह्मण अनाथ दुर्बल । तेथे तू केवळ अवतारलासि ।
ध्रुवासि स्थापिले उपन्यूकारणे । क्षीरसागर देणे तैसा येई ।।
अंबऋषीसाठी सोशी गर्भवास । दुर्वासा कासावीस तैसा येई ।।
विदुरासी भक्तपण तू उद्धवासी जवळी । अर्जुना सर्व काळी तैसा येई ।।
पतितपावन ब्रीद सोडवीन आता । तरीच पंढरीनाथा दास तुझा ।।
माझे गुणदोष न धरावे मनी । तारीले विमानी कीर्ती कोण ।।
पितीया पनना स्वामीची करणी । गणिका मजहूनी वद्य कोण ।।
अजामेळा अधिकार जावया वैकुंठा । माझीया अदृष्टा काय झाले ।।
शिशुपाले शिव्या दिधल्या सभेआंत । त्याहून पतीन घोर झालो ।।
नाथा म्हणे पुढती न बोली मी धर्म । अनुभवोनि प्रेम देई मज ।।[६]

जसा तू इतर भक्तांसाठी लगबगीने धावून गेलास तसाच मलाही सोडवायला ये. कारण मी संसाराच्या महाडोहात पडलो आहे. अहंकार हा कलीकाळाचा फास आहे म्हणून सर्वांनी अहंकाराचा नाश करून तेथे सुखाचा वास तयार करायला हवा ह्यावरून हेच सिद्ध होते. माझ्या चित्तवृत्तीच्या गाईला अहंकाराच्या अज्ञानाने ग्रासले आहे. आता मला फक्त तुझाच आधार आहे.

नाथपरंपरेतील संत साहित्यात हटयोगाला विशेष महत्त्व आहे. वास्तविक हटयोगाची मूळ बीजे बौद्ध धर्म साहित्यातूनच अंकुरलेली दिसून येतात. गौतमबुद्धांनी आपल्या शिष्यांना देखील हटयोगाच्या संदर्भात मार्गदर्शन केलेले आहे. हटयोग ह्या शब्दातील हट ह्या शब्दाचा विचार करता केवळ ईडापिंगळारूप चंद्र सूर्य एकत्र मिळविण्याची क्रिया एवढाच संकुचित अर्थ त्यात अभिप्रेत असेल असे वाटत नाही. कारण हठ किंवा हट्ट ह्या शब्दात निर्धारपूर्वक साधना करतो, त्यालाच हटयोगी असे म्हटले पाहिजे. ह्या हटयोगाचा प्रभाव मराठी संत साहित्यावर झालेला आहे.

संत नामदेवांनी गुरुकृपा प्राप्त करण्यासाठी जेव्हा औंढ्या नागनाथाकडे प्रयाण केले तेव्हा त्यांनी केलेली कृती आणि शैन-क्कांग यांच्यात साम्य आढळते. भावही सारखाच आहे. नामदेवाने सुरी हातात घेऊन पश्चातापदग्ध होऊन देवळात प्रवेश केला. मस्तकावर सुरी घालून लिंगपिंडावर रक्ताभिषेक केला, तेव्हा नागनाथाने गुरुकृपा करून नामदेवास म्हटले, नामदेवा, आता तू पंढरीस जा, तो तुझे दोष पावन करील.

थोडी वस्त्र सर्व दीधले ब्राह्मणा । अनुतापा जाणा केला असा ।।
सुरी एक करी आपण एकला । देऊळांत गेला तातडीने ।।
म्हणे सदाशिवा ऐका महादेवा । यम जाच भोगावा कोणे जाता ।।
मस्तकांत सुरी घालुनि कर्वाती । धार लिंगावरूनि पाडितसे ।।
तव नागनाथ म्हणे नामदेवा । पंढरी येथवा जाई आता ।।
हरील ती दोष करील पावन। वाढेल महिमान तुझा तेथे ।।

(मूळ नामदेव चरित्र पृ. ४७,४८)

दुसऱ्या एका प्रसंगी नामदेव म्हणतात, देवा मी जर तुझा खरा भक्त असेन तर माझा निश्चय सिद्धीस न्यावा. मी तुझे शतकोटी अभंग करीन. माझा पण जर पुरा झाला नाही तर मी माझी जीभ तुझ्यापुढे कापून टाकेन.

असेन मी खरा तुझा भक्त देवा । सिद्धीस हा न्यावा पण माझा ।।
शतकोटी तुझे करीन अभंग । म्हणे पांडुरंगा ऐक नाम्या ।।
नामा म्हणजे जरी न होता संपूर्ण । जेव्हा उतरीन तुज पुढे ।।

(नामदेव अभंगगाथा, १४०२)

नामदेवाच्या निर्धार ध्यानयोगी शेनक्कांग ह्याच्या तोडीचा व साम्य दाखविणारा वाटतो.[७]

भगवान गौतम बुद्धांच्या सहज तत्त्वाचा प्रभाव नामदेवांवर दिसून येतो. नाममहिमा, नामस्मरण, गुरुभक्ती, मध्यममार्ग इ. तत्त्वांचा विचार करता नामदेवांना हा वारसा सहजयानी बौद्धांकडून लाभला असे म्हणावे लागते. नामदेवांच्या अभंगवाणीत ह्या सहजतत्त्वाचा आविष्कार झालेला दिसून येतो. संत नामदेव, जळ जळी जळाकार आणि सुवर्ण व धन हे जसे परस्पर विलीन आहेत, त्याचप्रमाणे सहज विलीन होत असे म्हणतात,

जळी जळाकार दिसे जैशा परी । तैसा निराकारी साकारला ।।
सुवर्ण की धन धन की सुवर्ण । निर्गुण सगुण यथा परी ।।
ऐसा पूर्णपणे सहजी सहज । सखा केशीराज प्रगटला ।।
माझ्या मने तुझ्या चरणी दिली बुडी । इंद्रिये बापुडी वेडावली ।।
आता विषयसुख जाणावे हे कोणी। जाणोनि भोगणे कोण स्वामी ।।
देह सहजस्थिति राहिले निवांत। हृदयी सदा प्रेम वोसंडत ।।
(नामदेव अभंगगाथा ३३०, १५२)

संत नामदेवांची ही भाषा सहजयानी सिद्धांचीच भाषा होय हे वेगळे सांगावयाची गरज नाही.[८]

बुद्धांचा स्त्रीविषयक सुद्धा उदार दृष्टिकोन दिसून येतो. बुद्ध स्त्रियांना आदर व श्रध्दायुक्त दृष्टीने पाहत असत. त्यांना पुरुषांप्रमाणे लायक आणि पात्र समजत असत. नामदेवांनी देखील जनाबाईला पुरुषांइतकेच अधिकार बहाल केले होते आणि भक्तियोगात देखील जनाबाईला पुरुषांइतकेच अधिकार बहाल केले होते आणि भक्तियोगात सामावून घेतले होते. म्हणून तर संत साहित्यात जनाबाईला आधुनिक स्त्री संत म्हणावे लागते. हे सर्व कर्तृत्व नामदेवांकडेच जाते, म्हणून संत नामदेवांवर बौद्ध तत्त्वज्ञानाचा खूप मोठा प्रभाव दिसून येतो, हे वरील विस्तृत विवेचनावरून लक्षात येते.

## संदर्भ टीपा

१. शेळके मोहन, 'प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास', कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, पृ. क्र. ९७.
२. तत्रैव, पृ. क्र. ९९.
३. शेणोलीकर ह. श्री., 'प्राचीन मराठी वाङमयाचे स्वरूप', डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्र.आ., १९९१, पृ. क्र. ५१.
४. जोशी प्र.न., 'सार्थ श्री. ज्ञानेश्वरांची अभंगगाथा', सुविचार प्रकाशन, पुणे. १९६९, पृ.क्र. ४५१.
५. आवटे त्र्यं. ह., 'संत नामदेव महाराजांच्या अभंगाची गाथा', इंदिरा प्रकाशन पुणे, १९५३, अभंग क्र. ३५५.
६. तत्रैव, अभंग क्र. १५३२.
७. लोखंडे भाऊ 'मराठी संत साहित्यावर बौद्ध धर्माचा प्रभाव', अशोक प्रकाशन प्रबुद्धनगर, नागपूर, प्र.आ., जून १९७९, पृ. क्र. २७१-२७२.
८. तत्रैव, पृ. क्र. २७४.